# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०६/०७/२०१८

## दि.०६/०७/२०१८ रोजी दु.१२/०० वा.ते १५/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४१८/१८,भादविक ३०७,३४, भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५), महा.पो.का.कलम ३७(१)(३)/१३५ |
| **फिर्यादी** | मोहन पाटील, वय ३५ वर्षे, तुरूंगाधिकारी श्रेणी-२, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे |
| **आरोपी** | दुचाकीवरील २ अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०७/२०१८ रोजी सकाळी ०६/१० वा. ते ०६/२० वा.चे दरम्यान येरवडा कारागृहाचे मुख्य प्रवेशव्दारचे अलिकडे सुमारे ५० मिटर अंतरावर जेल भिंतीस लागुन असलेल्या पार्किगचे समोर,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे नेहमी प्रमाणे सकाळी जेल ओपनिंग डयुटीसाठी राहते घरातुन पायी निघुन पायी पायी येरवडा मध्यवर्ती कारागृह मुख्य प्रवेशव्दाराकडे जात असताना, फिर्यादी चालत चालत येरवडा कारागृहाचे मुख्य प्रवेशव्दारचे अलिकडे सुमारे ५० मिटर अंतरावर जेल भिंतीस लागुन असलेल्या पार्किंगचे समोर आले असता, सकाळी ०६/१० ते ०६/२० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे समोरुन कॉमर्सझोनचे दिशेने येरवडा जेल समोरुन, मोपेड गाडीवरुन आलेल्या दोन दुचाकीस्वारांनी, फिर्यादी यांचे समोर येवुन कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन, फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याचे उद्देशाने, गाडीवर मागे बसलेल्या इसमाने त्याचे जवळील अग्निशस्त्राने फिर्यादी यांचेवर १ राऊंड फायर केला असुन, त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांचे दिशेने त्यांचे हातातील छत्री फेकली त्यावेळी फिर्यादी हे आक्रमक झाल्याचे पाहुन ते गोंधळुन तोंडात पुटपुटत पुढे निघुन गेले, फिर्यादी हे बाजुस झाल्यामुळे फायर केलेला राऊंड फिर्यादी यांना लागला नाही. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. राजकुमार वाघचवरे ९८२३९९३२९९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | एमआयडीसी भोसरी पो स्टे २१२/१८,भादविक ३९२ |
| **फिर्यादी** | एक महिला, वय २४ वर्षे,रा.थेरगाव,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील एक अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०६/२०१८ रोजी २०/०५ वा.चे सुमारास शितोळे कंपनी समोर सार्वजनिक रोडवर एमआयडीसी भोसरी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांची मैत्रिण हया कंपनीतुन सुटल्यानंतर पायी जात असताना,नमुद इसमाने दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चैन त्यामध्ये पॅन्डल असलेले २५ हजार रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.टी.शेंडगे ९७०२४२१२६० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**